
Mhaske D D.

ज्ञान-विज्ञान विमुक्तये


Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

An International Multidisciplinary Quarterly Research Journal





# AJNATA




Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - III January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | दैनंदिन जीवनात प्राणायामाचे फायदे<br>**प्रा. डॉ. दिलीप दत्तात्रयराव भडके** | १-४ |
| २ | भ्रष्टाचार : भारतीय लोकशाही व प्रशासनापुढील एक आव्हान<br>**प्रा. डॉ. बि. आर. खत्तुरवार** | ५-११ |
| ३ | भारतीय संविधानातील महिला कल्याण! विषयक तरतुदी<br>**प्रा. डॉ. पुरणशेट्टीवार व्ही. एन. (पुदरोड)** | १२-१४ |
| ४ | लोकशाहीचे भवितव्य : एक दृष्टिक्षेप<br>**प्रा. संजय मोहाडे** | १५-१८ |
| ५ | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने<br>**गजभारे सुरेश बळीराम** | १९-२४ |
| ६ | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने<br>**प्रा. बालाजी गंगाराम गायकवाड** | २५-३० |
| ७ | छत्रपती संभाजी महाराजांच्या लोकशाहीप्रणित स्वराज्यापुढील आव्हाने<br>**प्रा. काठेवाडे पुंडलिक एम.** | ३१-३४ |
| ८ | पंडित जवाहरलाल नेहरुंचे लोकशाही विषयक विचार<br>**प्रा. नामदेव तूकाराम मोरे** | ३५-३८ |
| ९ | भारतीय लोकशाही समोरील आव्हानांचा आढावा<br>**प्रा. डॉ. पी. डी. सूर्यवंशी** | ३९-४३ |
| १० | स्त्रीशिक्षणातील अडथळे<br>**Shri. Bhagwat D. Gore**<br>**Shri. Vitthal M. Lodhe** | ४४-४९ |
| ११ | भारतीय लोकशाहीचे यश आणि अपयश एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. पी. के. एकंबेकर** | ५०-५२ |
| १२ | लोकशाही सक्षमीकरणात ग्रंथालयाची भुमिका<br>**डॉ. श्रीमती आवचार सविता सदाशिव** | ५३-५६ |
| १३ | लोकशाही सक्षमीकरणात ग्रंथालयाची भुमिका<br>**डॉ. श्रीमती आवचार सविता सदाशिव** | ५७-६० |
| १४ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>**प्रा. डॉ. सकनुरे एस. एल.** | ६१-६५ |

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | लोकशाही यशातील महत्त्वपुर्ण घटक<br>**डॉ. प्रा. विठ्ठल सांडूर** | ६६-६९ |
| १६ | नोटा मताधिकारी आणि भारतीय लोकशाही: एक विश्लेषण<br>**प्रा. संजय किशनराव भालेराव** | ७०-७५ |
| १७ | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने<br>**प्रा. डॉ. वसंत पांडूरंग सरवदे** | ७६-७८ |
| १८ | लोकशाही सक्षमीकरणात ग्रंथालयाची भूमिका<br>**सीमा पोफळे**<br>**डॉ. विवेक साठे** | ७९-८१ |
| १९ | लोकशाही कल्याणकारी राज्याचे यश-अपयश<br>**प्रा. शेख मोहंमत हनिफ इस्माईलसाब** | ८२-८५ |
| २० | भारतीय लोकशाहीचे भवितव्य<br>**प्रा. डॉ. खंदारे रामेश्वर माधवराव** | ८६-८८ |
| २१ | भारतीय लोकशाही आणि नागरी समाज<br>**प्रा. डॉ. राजेंद्र ज्ञा. शिंदे** | ८९-९२ |
| २२ | निवडणूक प्रक्रियेतील सुधारणांच्या माध्यमातून लोकशाहीचे पुनरुज्जीवन<br>**श्रध्दा मोहन पवार** | ९३-९६ |
| २३ | भारतीय लोकशाही वाटचाल : एक आढावा<br>**प्रा. जी. के. पाटील** | ९७-१०० |
| २४ | शिवरायांचे लोककल्याणकारी प्रशासन<br>**सु. ग. लखपत्रेवार** | १०१-१०४ |
| २५ | वर्तमान भारतीय लोकशाही पुढील अव्हाने<br>**प्रा. सुनिलचंद्र सोनकांबळे** | १०५-१०८ |
| २६ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>**श्री. सुरज म. देशमुख**<br>**श्री. कैलास गो. खेडुळकर**<br>**डॉ. व्यंकट विळेगावे** | १०९-११७ |

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | एकविसाव्या शतकातील भारतीय लोकशाही : आव्हाने आणि पुढील वाटचाल भारतीय समाजातील स्त्री, दलित आदिवासी व अल्पसंख्यांकाच्या समस्या<br>**सुरेखा इंगळे** | ११८-१२१ |
| २८ | भारतीय लोकशाही शासन व्यवस्थेतील सु-शासन आणि सभ्य समाज़<br>**डॉ. भालेराव जे. के.** | १२२-१२५ |
| २९ | भारतीय संसदीय लोकशाहीतील वास्तविकता - एक चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. बळवंत विष्णु घोगरे** | १२६-१२८ |
| ३० | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने व आर्थिक सुधारणा<br>**प्रा. डॉ. विलास तुळशीराम ठाकूर** | १२९-१३३ |
| ३१ | भारतीय आदिवासी समाज, धर्म व स्त्री जीवन<br>**प्रा. डॉ. उमेश भ. पुजारी** | १३४-१३७ |
| ३२ | भारतीय लोकशाही शासन पध्दतीतील उणिवा<br>**डॉ. वितेश भारत निकले** | १३८-१४१ |
| ३३ | भारतीय लोकशाहीपूढील आव्हाने<br>**डॉ. भगवान शंकरराव वाघमारे** | १४२-१४५ |
| ३४ | महिला सक्षमीकरण आणि विकास<br>**प्रा. गोंविद येडले** | १४६-१५० |
| ३५ | आर्थिक सुधारणांचे भारतीय अर्थव्यवयस्थेवरील परिणाम<br>**प्रा. राम गणपतराव शेवलीकर** | १५१-१५४ |
| ३६ | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्री दृष्टीकोन<br>**प्रा. भारत शिंदे** | १५५-१५७ |
| ३७ | नागरी समाजातून भारतीय लोकशाहीचे संवर्धन<br>**डॉ. दयाराम द. मस्के** | १५८-१६५ |
| ३८ | महाराष्ट्रातील आदिवासी विकास आणि वास्तव<br>**प्रा. डॉ. एस. एस. जाधव** | १६६-१६८ |
| ३९ | भारतीय समाजातील स्त्री : काल आणि आज<br>**डॉ. श्रीधर खामकर** | १६९-१७१ |

# ३७. नागरी समाजातून भारतीय लोकशाहीचे संवर्धन

डॉ. दयाराम द. मस्के
सहाय्यक प्राध्यापक, लोकप्रशासन विभाग, आदर्श शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हिंगोली.

नागरी समाज ही संकल्पना वास्तविक लोकशाही या संकल्पनेपेक्षाही पुरातन आहे. प्राचीन ग्रिक, रोमन, मोहंजोदाडो या नगर संस्कृतीतूनच निर्माण झालेली आहे परंतु तत्कालीन वास्तववादी व्यवस्थेतून नागरी समाज हा परवलीचा शब्द वापरात आला नाही. नजीकच्या काळात राजेशाही, हुकूमशाही, लष्करशाही अथवा लोकशाही हे शासन प्रकार समोर आले मात्र आपल्या मागण्या, विचार व इच्छा यांच्या पूर्ततेसाठी लोक समूह विशिष्ट हेतूने प्रेरित होऊन एकत्र येत गेला तो ज्या नगराकार लोक वस्तीत राहत होता त्यातून समूह, स्वयंसेवी संघटन, संस्था, मत ऐक्यता आणि समान हित संबंध यातूनच या संकल्पनेचा विकास झालेला आहे अलीकडील काळात जागतिक पातळीवर ही संकल्पना अधिक चर्चिली जात आहे यास बौद्धिक वर्ग, प्रसार माध्यम, चर्चा सत्र, शैक्षणिक परिषदा आणि शैक्षणिक अभ्यासक्रमातही ही संकल्पना प्रभावीपणे मांडण्याची प्रक्रिया गतिशील झाली आहे.

नागरी समुदायाचा अर्थ

जागतिक बँकेच्या मते, " नैतिक, सांस्कृतिक, राजकीय, शास्त्रोक्त, धार्मिक किंवा परोपकारी विचारांवर आधारीत, आपल्या सदस्यांच्या किंवा इतरांच्या स्वारस्ये आणि मूल्यांची अभिव्यक्ती करणाऱ्या सार्वजनिक जीवनात उपस्थिती असलेल्या गैर-सरकारी आणि ना-नफा कार्य करणाऱ्या संस्थांचे विस्तृत स्वरूप म्हणजे नागरी समाज होय." नागरी समाज याच संकल्पनेस इंग्रजी भाषेत (Civil Society) म्हणून संबोधलेजाते अर्थात नागरी समुदाय ही अगदीच अलीकडील काळात झालेल्या स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्थित्यंतराच्या सकारात्मक परिणामातुन निर्माण झालेली समाजाभिमुख विकसनशील संकल्पना ही नागरी समाज आहे.

नागरी समुदायाचा उदय आणि विकास

१८५० नंतर जवळपास नागरी समाज ही संकल्पनाच वैश्विक स्तरावरून हद्दपार झाल्यासारखी स्थिती निर्माण झाली होती परंतु अलीकडील १९७० च्या दशकानंतर या संकल्पनेस पुनर्जीवन प्राप्त झाले आहे. जागतिक स्तरावर वसाहतवादातून, साम्राज्यवादातून, साम्यवादातून, नाझीवादातून, फॅसिझम मधून, लष्करशाहीतून, राजेशाहीतून, भांडवलवादातून तसेच हुकूमशाहीमुळे स्वतःची व राष्ट्राची सुटका करून घेऊन समाजवाद, मानवतावाद

निर्माण करण्यासाठी आणि मानवतावादातून लोकशाहीची प्रस्थापना करण्यासाठी नागरी समुदायाची चळवळ सर्वदूर विकसीत होण्याची गतिमान प्रक्रिया निर्माण झाली आहे. या प्रक्रियेस जगातील कोणतेही राष्ट्र सद्यस्थितीत अपवाद राहिले नाही.

प्रतिरोधक गटाकडून अन्यायाची, द्वेषाची, त्वेषाची, रोषाची आणि नकाराची भूमिकाच नागरी समाज संकल्पनेस अधिक खतपाणी घालत आहे. प्रामुख्याने भांडवलवादी वर्गाकडून कामगार वर्गावर, मालक वर्गाकडून नौकर वर्गावर आणि सरकार कडून जनतेवर जेंव्हा चुकीची अमानुष धोरणे राबवली जातात आणि त्यास विरोध करण्यासाठी व चुकीची व्यवस्था तथा धोरणातील बदलासाठी शासन व्यवस्थेस संमांतर असणारी लोकाभिमुख यंत्रणा म्हणून देखील नागरी समाज कार्यरत असतो आणि आहेच. नागरी समाजाचे आस्तित्व प्रकर्षाने दिसते आणि जाणवतेही. शासनकर्ती जमात आणि व्यवस्था काबूत ठेवण्यासाठी त्यावर अंकुश निर्माणकरण्यासाठी लोकशाहीचा आधाराधारस्तंभ म्हणून कार्य गती साध्य करण्यासाठी नागरी समाज प्रभावीपणे कार्यरत आहे यास भारतीय संघराज्य देखील अपवाद नाही.

नागरी समुदायाचे स्वरूप

नागरी समाजाचे स्वरूप हे निरंतर स्थळ, काळ, उपलब्ध परिस्तिथी यानुसार लवचिक, लोकाभिमुख आणि नेहमीच परिवर्तनाच्या प्रक्रियेस पूरकच राहिले आहे. नागरी समाजाची भूमिका ही स्व्यंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, जात, वर्ण, लिंग, धर्म, भाषा, प्रादेशिक समस्या, वाद-विवाद व तंटामुक्ती आणि जन्म स्थळाधारे निर्माण झालेली नागरिकांची सामाजिक संघटने नागरी समुदाय म्हणूनच विचारात घेतली आणि गणली जातात. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती आणि डोके तितके विचार या उक्ती नुसार सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, प्रासंगिक, वैचारिक, आर्थिक किवां कोणत्याही समान हितसंबंधी विचार वेधक भूमिकेसाठी कोणताही गट हा आपल्या ध्येय व उद्दिष्टांसाठी एकत्र येत स्वतःचे संघटन वृधिंगत करत असतो. तो भाग देखील नागरी समुदायाचे अंग म्हणूनच विचारात घ्यायला हवे.

सरकार अर्थात शासन म्हणून जे काम सरकारकडून किंवा शासकीय व व्यवस्था कार्यालयाकडून होणे अपेक्षित आहे ते किवा वंचित, दुर्लक्षित प्रश्न सोडवण्याचे विकासाभिमुख कार्य परिणामोन्मुखरित्या पूर्ण व्हावेत यासाठी नागरी समुदायाकडून नियमित प्रयत्न केले जाते. सरकारच्या बरोबरीचीच निकड या समाजाची निर्माण झालेली आहे. विस्थापित, उपेक्षित आथवा शोषित असलेल्या लोक समूहास प्रस्थापित करण्यासाठी जगभर विविध स्वरूपातील बहुआयामी स्वयं सेवी संघट उभारले जात आहे तसेच आता ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे. हे

निर्विवाद मान्यच करावे लागते. जागतिक पातळीवर नागरी समाजाचे प्रस्थ विकसित होताना भारत देखील त्यात मागे नाही. आज देखील नागरी समुद्यामुळे विकासाचा प्रवाह अधिक प्रवाहित झाला आहे.

व्याप्ती

नागरी समाज ही संकल्पना मानवीय विश्वास सर्वस्पर्षीत आहे. जेथे स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि राष्ट्रीय एकात्मतायुक्त अखंडता असते, दिसते अथवा ती विस्थापित असल्यास प्रस्थापित करण्यासाठी सर्वकष प्रयत्न केले जातात तेथे नागरी समाजाने आपले कार्यक्षेत्र व्यापलेले आहे, उपेक्षित, बहिष्कृत, शोषित, पिडीत, धार्मिक, कष्टकरी, शेतकरी, महिला व बालकल्याण, पर्यावरण, वंचित, लैंगिक भेदभावाचे, वर्णाचे, वंशाचे, जन्म स्थळाचे, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय निरक्षरतेचे बळी ठरलेल्या वर्गासाठी नागरी समाज निरंतर व्याप्तीयुक्त कार्यप्रवण राहिला आहे. नागरी समाजाने त्याच्या कार्यात्मक व्याप्तीने मानवीय जगच व्यापून टाकले आहे.सर्वांगीण सापत्नभाव संपुष्टात आणण्यासाठी नागरी समाजाची अनिवार्यता निर्माण झाली आहे

नागरी समाजाला प्रामुख्याने कार्यात्मक कार्यशैलीमुळे खालील प्रमाणे वर्गीकृत करता येते

कृषी (Agriculture)

दारिद्रय निर्मूलन (Poverty Removal)

सामाजिक न्याय व सक्षमीकरणासह समुदाय विकास (Community Development with social justice and empowerment)

शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधन (Education, Training and Research)

ग्रामीण आणि शहरे, महानगरांचा विकास (Rural and Cities, Urban Development)

महिला व बाल कल्याण (Child and Women Protection)

भ्रष्टाचार (Corruption)

ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेणे (Caring for Senior Citizens)

विकलांगता (Disability)

विज्ञान व तंत्र ज्ञानाचा विकास (Science & Technology Development)

सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा (Cultural and Historical Heritage)

आपत्ती व्याव्स्थापन (Disaster Management)

पिण्यायोग्य पाणी (Drinking Water)

पर्यावरणीय मुद्दे (Environmental Issues)

आदिवासी समुदायाचे कल्याण (Tribal Community's Welfare)

आरोग्य आणि स्वच्छता (Health & Hygene)

आवास आणि झोपडपट्टी (Housing & Slums)

लोकसंख्या (Population)

जल व्यवस्थापन (Water Management)

नागरी समुदाय आणि भारतीय लोकशाही

नागरी समाजाने भारतीय लोकशाही समृद्ध करण्यात महत्वपूर्ण योगदानात्मक भुमिका वठवली आहे. राजकीय पक्षांचा अंतिम हेतू हा सत्ता प्राप्ती असतो. सत्ता प्राप्तीसाठी कोणताही राजकीय पक्ष तडजोड करत असतो. १९६० पर्यंत सामान्यतः भारतामध्ये एक पक्षीय सत्ता राहिली परंतु बहुसंख्य वर्ग हा सत्तेत सहभागी झाला नव्हता किंवा तशी संधी निर्माण होऊ दिली नाही हे देखील वास्तव भारतीय लोकशाही बाबत सत्यच आहे. लोकशाही प्रबळ, प्रगल्भ वैश्विक मार्गदर्शक होण्यासाठी भारतीय राज्यघटनेने भारतीय गणराज्यातील नागरिकांना बहाल केलेले मूलभूत हक्क हेच प्रामुख्याने दिशादर्शक तसेच दीपस्तंभ म्हणून देखील कार्य करत आहेत. कायदेमंडळ , कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ या सोबतच प्रसार माध्यमासह राजकीय पक्ष, दबाव गट, स्वयं सेवी संस्था, आणि प्रासंगिक आंदोलने देखील भारतीय लोकशाही संवर्धित आणि संरक्षित करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहेत.

नागरी समाज आणि भारतीय लोकशाही

भारतातील वाढत्या मध्यमवर्गाचे अस्तित्वदेखील सांस्कृतिक आणि सामाजिक दुभंगलेपणाचे आहे. त्याचा परिणाम म्हणून भारतात एक तिरसट , विस्कळीत आणि अन्याय्य ग्रस्त नागरी समाज निर्माण झाला आहे. तो वेळोवेळी आणि जागोजागी 'बहुसंख्याक' असण्याचे निरनिराळे स्थानिक दावे आग्रहाने पुढे मांडतो आणि 'अल्पसंख्याकां'ना या ना त्या मार्गाने दडपण्याचा प्रयत्न करतो.

लोकसभा निवडणुकांच्या रणधुमाळीत भारतातल्या राजकारणाची चर्चा प्रसारमाध्यमांमधल्या ऊठसूट केल्या जाणाऱ्या, जनमतकौलाला साजेशा उथळ प्रश्नाभोवती केंद्रित झाली आहे आणि त्यामुळे इतरांना वगळून आणि इतरांच्या विरोधात केल्या जाणाऱ्या अस्मितांच्या राजकारणाविषयीचे भारतीय लोकशाहीतील गंभीर प्रश्न मुख्य प्रवाही राजकीय विचारविश्वातून गायब झाले आहेत. याचा अर्थ ते प्रश्न संपले आहेत असे नाही, परंतु काँग्रेस आणि भाजप यांच्या साटमारीत त्यांची चर्चा वरवरची बनून त्यांच्यातील गुंतागुंत वाढली आहे.

वासाहतिक राजवटीच्या दीर्घ पल्ल्याच्या कालखंडात भारतीय समाजात अनेक ठळक सामाजिक, राजकीय, आर्थिक बदल घडत गेले. वैचारिक घुसळण घडली. या काळात भारतीय समाजाच्या आधुनिकीकरणाची,

राष्ट्रीयीकरणाची, लोकशाहीकरणाची, भांडवलीकरणाची अशा अनेक प्रक्रिया एकाच वेळेस उलगडत गेल्या. या प्रक्रियांच्या सरमिसळीतून भारतात विविधांगी राष्ट्रीय अस्मिता साकारल्या. वसाहतवादाचा आणि राष्ट्रवादाचा राजकीय प्रकल्प खरे म्हणजे आधुनिकीकरणाचा आणि म्हणून व्यक्तीकरणाचा (indivialization) चा प्रकल्प मानला गेला. परंतु या सर्व काळात नव्या समुदायांची आणि सामूहिक आत्मभानांची जडणघडणही झाली. स्वातंत्र्योत्तर काळात अस्मितांच्या राजकारणात भौतिक संघर्षाच्या छटादेखील गडदपणे मिसळल्या गेल्या.

जमातवादी राजकारणातून 'बहुसंख्याक' विरुद्ध 'अल्पसंख्याक' असे नवे शत्रुत्व आणि 'अल्पसंख्याक' ही एक नवी कायदेशीर सामाजिक वर्गवारी म्हणून उदयाला आली. या वर्गवारीचा वापर भारतीय राज्याने समुदायांच्या अधिकारांची मांडणी करताना केला, तसाच पाकिस्तानच्या मागणीत आणि एरवीही लोकशाहीतील प्रतिनिधित्वासाठीही केला गेला. या विभागणीने समकालीन भारतीय समाजाच्या सांस्कृतिक जीवनातही खोलवर शिरकाव करून एकंदर सामाजिक-सांस्कृतिक विश्वाचे 'जमातीकरण' घडवले आहे. अस्मितांच्या राजकारणाच्या या खोलवर हस्तक्षेपाचा परिणाम म्हणून लोकशाही चौकट तुटून पडून वेळोवेळी हिसाचाराचे राजकारणही फोफावले आहे. परंतु सद्यस्थितीत प्रकाश आंबेडकर यांनी निर्मिलेल्या वंचित आघाडीच्या माध्यमातून लोकशाही सहभागाची संधी देखील निर्माण झाली आहे

राजकारणात दोन समुदायांमधील सत्ताप्राप्तीचे टोकाचे आणि राजकीय पक्ष मुक्तीचे उद्घोषणेचे राजकारण थोपवण्यासाठी लोकशाही टिकवण्यासाठी राजकीय साक्षरतेचे काम आता नागरी समाजाकडून प्रभावीपणे होणे गरजेचे आहे. प्रसामाध्यमातील सक्तीचे किंबहुना सांस्कृतिक दहशतवादाचीच प्रस्थापना करण्यात अलीकडील काळात राजकीय सत्ताधीश पक्षच जाणीवपूवक प्रयत्न करताना दिसत आहेत. प्रबळ सत्ताधीश राजकीय पक्षांडून विरोधी पक्ष आणि नागरी समाज कोणत्या ना कोणत्या कारणाने दबावतंत्र वापरून व्यस्थाच खीळ खिळी करण्याची प्रबळ मानसिकता कथनी आणि करणीतून व्यक्त केली जात असून हे संबंध ठळकपणे आणि पुष्कळदा हिसंक पद्धतीने व्यक्त झाले आहेत परंतु एरवीही आम्ही आणि इतर अशी सत्ता आणि विरोधी पक्ष अशी विभागणी भारतीय राजकारणात निरनिराळ्या संदर्भात साकारली आहे. या विभागणीत जसे प्रतीकांचे (राम मंदिर, शिवाजी महाराज, इंदू मिल, स्टॅचू ऑफ लिबर्टी, प्रादेशिक भाषा, निरनिराळ्या जात समुदायांचे संत-महंत-महाराज; पुतळे, विमानतळ-हमरस्ते-उड्डाणपूल-विद्यापीठे इत्यादींना दिलेली महा(पुरुषांची) नावे इत्यादी) स्थान महत्त्वाचे राहिले आहे, तसेच खुद्द लोकशाही प्रक्रियेचे स्थानदेखील महत्त्वाचे राहिले आहे. सामाजिक-सांस्कृतिक प्रतीके स्वभावत: शत्रुभावी नसतात; परंतु ज्याला आपण सर्वसाधारणपणे प्रतीकांचा 'राजकीय' वापर म्हणतो, त्या व्यवहारात ती शत्रुभावी बनू शकतात. हे सर्व चुकीचे

घडत आहे हे सांगण्यासाठी, विवेकी प्रचार तसेच प्रसार करण्यासाठी समाज व्यवस्थेतील तृतीय क्षेत्र म्हणून देखील नागरी समाज कार्यरत राहतो .

भारतात नव्याने स्थापन झालेल्या लोकशाही समाजापुढे दोन ठळक पेच होते. त्यातला एक होता लोकशाहीतील प्रतिनिधित्वासंबंधीचा आणि दुसरा होता लोकशाहीचा आशय विस्तारून सामाजिक न्यायाची प्रस्थापना करण्याविषयीचा. स्वातंत्र्योत्तर भारतीय समाज कमालीचा विषम स्वरूपाचा असल्याने हे दोन्ही प्रश्न महत्त्वाचे आणि गुंतागुंतीचे ठरले. तसेच या दोन्ही पेचांच्या संदर्भात सामूहिक अस्मितांच्या 'रचितां'नी महत्त्वाची भूमिका बजावली. या भूमिकेत कधी बहुलतेला आणि समानतेला वाव मिळून तसेच वंचित घटकांचे प्रतिनिधित्व वाढून लोकशाहीचा आशय विस्तारला, तर कधी समुदायांमधील शत्रुभावी संबंध लोकशाहीपेक्षा प्रभावी बनून हिंसाचाराचे राजकारण घडले, तर कधी लोकशाहीतील प्रतिनिधित्वाचा टक्का वाढवण्यासाठी शत्रुभावी संबंधांचा आणि हिंसक राजकारणाचा खुबीने आधार घेतला गेला.

या पेचांच्या अवतीभोवती गेल्या ७०-७२ वर्षांच्या काळात भारतात विविधतांचा स्वीकार करणारी समावेशक लोकशाही घडवण्याचे आव्हान निरनिराळ्या कारणांनी अधिक गंभीर बनत गेले आहे. नव्वदीचे दशक हे अस्मितांच्या राजकारणाचे दशक होते. त्यातील मंडल-क्रांतीनंतरचे ओबीसी राजकारण जातविरोधी आशय फारसा पुढे नेऊ शकले नाही आणि त्याने जातींच्या स्वतंत्र अस्मितांची नव्याने उभारणी केली. त्यातून निर्माण झालेल्या शत्रुत्वाचा, समुदायांतील कप्पेबंद विभागणीचा तोटा बहुधा अतिशय क्रूरपणे 'समुदायां'तील बायकांना सहन करावा लागला. यातूनच सामाजिक, राजकीय, न्यायिक, आर्थिक, संस्कृतिक, प्रशासनिक,शैक्षणिक हितांचे नागरी समुदायाचे संघटने विकसित होत आहेत. जातवादी राजकारणाचे रूपांतर जात पंचायतीच्या फतव्यात आणि वर्चस्वशाली जातींच्या आरक्षणाच्या मागणीत झाले, ही त्यातील सर्वात दुर्दैवी बाब. कारण आरक्षण हे घटनात्मक चौकटीत सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाच्या निकषावर आवलंबून असताना ते आर्थिक निकषावर देखील एका विशिष्ट नागरी समुदायाकडून मागितले गेले आणि शासन व्यवस्था देखील त्यास बळी पडली. अर्थात हे सर्व नागरी समुदाचेच यश आहे. हेच अंतिम सत्य आहे

राज्यसंस्थेच्या, न्यायालयाच्या आणि राजकीय पक्षांकडून अपेक्षित असणाऱ्या तटस्थ भूमिकेला मिळालेले आव्हान. नव्वदनंतरच्या काळात केवळ राजकीय पक्षांचीच नव्हे, तर न्यायालयांची आणि पर्यायाने राज्यसंस्थेचीदेखील सामाजिक संघर्षातील तटस्थतेची भूमिका बदलून त्यांनी सामाजिक अंतरांना आणि संघर्षात्मक राजकारणाला उत्तेजन दिलेले दिसते. दिल्लीतील शिखांचे शिरकाण, शाहबानो प्रकरण, सर्वोच्च न्यायालयाचे 'हिंदुत्वा'ची व्याख्या करणारे किंवा अगदी अलीकडे रामजन्मभूमी-बाबरी मशीद प्रकरणांत दिले गेलेले निर्णय ही सर्व त्याचीच उदाहरणे मानता

येतील. अस्मितांच्या विपर्यस्त राजकारणाने निवडणुकांच्या मुख्य प्रवाही राजकारणाची चौकट सर्वस्वी व्यापून टाकली आहे. त्यातून निवडणुकांचे राजकारण अस्मितादर्शक, प्रतीकात्मक मुद्द्यांवर खेळण्याचा प्रयत्न सर्व राजकीय पक्षांनी सुरू केलेला दिसतो. मात्र, निवडणुकीच्या लोकशाही राजकारणातून समूहांच्या निव्वळ प्रतीकात्मक आकांक्षांची पूर्तता झाल्यामुळे अस्मितांच्या राजकारणाचा केंद्रिबदू लोकशाहीबाह्य चौकटीतील आग्रही आविष्कारांकडे, झुंडशाहीकडे आणि हिंसाचाराकडे सरकलेला दिसतोय . 'आमच्या मागण्या मान्य करा, नाही तर खुर्च्या खाली करा किंवा परिणाम भोगावे लागतील' ही भाषा राजकारणाची सार्वत्रिक भाषा बनली आहे. त्यात असणारा उद्धटपणा, अरेरावी लोकशाहीत आपेक्षित असणाऱ्या संवादाला, चर्चेला तर मारक आहेच, परंतु लोकशाहीबाह्य सत्ताकेंद्रे निर्माण करणारी आहेत . यातूनच नागरी समाज समस्याविषयीचा जागर, राजकीय साक्षरतेचा प्रचार व प्रकार करत सत्ताधीशाच्या बाजूने अथवा विरोधात मत निर्माण करण्याचे कार्य देखील नागरी समाजाकडून होत आहे.

सर्वात मोठा धोका नागरी समाजाच्या 'बहुसंख्याकीकरणा'चा आहे आणि हा धोका आर्थिक विषमतांशी धागा जुळवतो. गेल्या पाव शतकाच्या काळात नवीन आर्थिक धोरणांची अंमलबजावणी होत असताना भारतातील निरनिराळ्या सामाजिक गटांतील आर्थिक विषमता आणि सांस्कृतिक दारिद्र्य वाढतच गेलेले आढळेल. भारतातील वाढत्या मध्यमवर्गाचे अस्तित्वदेखील सांस्कृतिक आणि सामाजिक दुभंगलेपणाचे आहे. त्याचा परिणाम म्हणून भारतात एक तिरसट, विस्कळीत आणि अन्याय्यग्रस्त नागरी समाज निर्माण झाला आहे. तो वेळोवेळी आणि जागोजागी 'बहुसंख्याक' असण्याचे निरनिराळे स्थानिक दावे आग्रहाने पुढे मांडतो आणि 'अल्पसंख्याकां'ना या ना त्या मार्गाने दडपण्याचा प्रयत्न करतो. हे अल्पसंख्याक कधी ईशान्य पूर्वेतील आदिवासी, कधी खैरलांजीतले दलित, महाराष्ट्रातील बिहारी मजूर, मुझफ्फरनगरमधील मुस्लीम तसेच काश्मिरी पंडित अशी निरनिराळी रूपे धारण करतात. लोकशाहीबाह्य चौकटीतील 'बहुसंख्याकां'ची मांडणी आणि तिचा आग्रही आविष्कार हा या सर्व संघर्षांतील समान धागा म्हणजे 'समावेशक' लोकशाहीच्या संकल्पनेतील महत्त्वाचे आव्हान ठरले आहे. ते साध्य होण्यासाठी राजकीय साक्षरतेचा प्रसार सर्वदूर तसेच संपूर्ण भारतीय संघराज्यात नागरी समुदायाकडूनच निरंतर झाला पाहिजे.

संदर्भ

1) पी साईनाथ(२०११),' संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव,पारगावकर,पुणे.पृ.९
2) धनगरे ड. ता.(२००५), संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव,पारगावकर,पुणे.पृ.१२८
3) Norberto Bobbio (2001) Gramsi and the concept of civil society in keanc (ed) civil society and the state : New European perspectives verso, P. 8
4) पी साईनाथ(२०११),' संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव,पारगावकर,पुणे.पृ.९

5) धनगरे ड. ता.(२००५), संकल्पनाचे विश्‍व आणि सामाजिक वास्तव,पारगावकर,पुणे.पृ.१२८

6) Norberto Bobbio (2001) Gramsi and the concept of civil society in keanc (ed) civil society and the state : New European perspectives verso, P. 8

7) तांबे श्रुती(२०११),'नागरी समाजाच्या पुनर्व्याख्येची गरज' परिवर्तचा वाटसरू.पृ.१३

8) पी साईनाथ(२०११),' संकल्पनाचे विश्‍व आणि सामाजिक वास्तव,पारगावकर,पुणे.पृ.९

9) धनगरे ड. ता.(२००५), संकल्पनाचे विश्‍व आणि सामाजिक वास्तव,पारगावकर,पुणे.पृ.१२८

10) Norberto Bobbio (2001) Gramsi and the concept of civil society in keanc (ed) civil society and the state : New European perspectives verso, P. 8

11) तांबे श्रुती(२०११),'नागरी समाजाच्या पुनर्व्याख्येची गरज' परिवर्तचा वाटसरू.पृ.१३

12) तांबे श्रुती(२०११),'नागरी समाजाच्या पुनर्व्याख्येची गरज' परिवर्तचा वाटसरू.पृ.१३

13) पी साईनाथ(२०११),' संकल्पनाचे विश्‍व आणि सामाजिक वास्तव,पारगावकर,पुणे.पृ.९

14) धनगरे ड. ता.(२००५), संकल्पनाचे विश्‍व आणि सामाजिक वास्तव,पारगावकर,पुणे.पृ.१२८

15) Norberto Bobbio (2001) Gramsi and the concept of civil society in keanc (ed) civil society and the state : New European perspectives verso, P. 8

16) तांबे श्रुती(२०११),'नागरी समाजाच्या पुनर्व्याख्येची गरज' परिवर्तचा वाटसरू.पृ.१३